# आधुनिक आईस ...

ए आये, अगं थांब इथे जरा
बघतो तवा फिरत असतेस तरातरा
म्या म्हनलं कसली एवडी घाई
मला कवळून बस ना जरा बाई!

दुनिया बगायची लई हौस तुला
कशाला पैदा केलंस मग मला?
बापाला नावं नगं ठिऊस बये
खायाला दे मला चल हिकडे ये!

हापिस हापिस करत असतेस
कुनाकुनाला भेटत असतेस
घरी पोर आपलं माती चाटतंय
याचे तुला कसे नाही भय?

म्या म्हनतो सोड तुजी नोकरी
ऱ्हा घरी बनीव गरम भाकरी
दादला बी खुश आन पोर बी
खुश करीन दावून माज्या कसबी

*By: Abhay B. Joshi*